
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730


AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA




Volume - VIII, Issue - IV
October - December - 2019
MARATHI PART - I

IMPACT FACTOR / INDEXING

Ajanta
Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जागतिकीकरणो कृषी अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>प्रा.डॉ. विठ्ठल निलकंठ ठावरी | १-५ |
| २ | शासनाचे शेतीविषयक धोरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या<br>प्रा. डॉ. राजेश के. चिमणकर | ६-१३ |
| ३ | कृषी विकासाच्या प्रक्रियेत शेतकरी गटाची भूमिका<br>प्रा. मनोहर आं. गुडधे | १४-१७ |
| ४ | भारतीय शेतीतील परतावा<br>डॉ. आशिष महातळे | १८-२४ |
| ५ | कृषी आणि ग्रामीण विकास : आव्हाने आणि उपाय<br>प्रा. डॉ. व्ही. डब्लु. मालेकार | २५-३६ |
| ६ | शेतकरी आत्महत्या आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय एक ऐतिहासिक दृष्टीकोण<br>प्रा. डॉ. नथ्थु सि. गिरडे | ३७-४० |
| ७ | शासनाचे कृषी धोरणे व कृषी क्षेत्रावरील परिणाम<br>प्रा. नरेंद्र के. पाटील | ४१-४५ |
| ८ | सेंद्रीय शेती आणि कृषी विकास<br>प्रा. नागनाथ जयवंतराव मनुरे<br>डॉ. नितीन कावडकर | ४६-५० |
| ९ | भारतीय शेती व शेतकरी विकासाचा अंतिम स्त्रोत आणि मर्यादा<br>प्रा. रवींद्र बा. शेंडे | ५१-५५ |
| १० | ग्रामीण विकासामध्ये स्त्रियांच्या स्वयं सहायता बचत गटाचे योगदान<br>प्रा. युवराज पी. जांभूळकर | ५६-६० |
| ११ | जागतिकीकरणाचे कृषीअर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>प्रा. गिरिधर केशव कुनघाडकर | ६१-६३ |
| १२ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक चिंतनीय समस्या<br>प्रा. डॉ. मनिषकुमार काशिनाथ कायरकर | ६४-७० |




Scanned with OKEN Scanner

VOLUME - VIII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ९. भारतीय शेती व शेतकरी विकासाचा अंतिम स्त्रोत आणि मर्यादा

**प्रा. रवींद्र बा. शेंडे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर.

भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा शेती आणि शेतकरी आहे. हा मुख्य कणा मजबूत करण्याकरीता डिफेन्स सारखे लक्ष या क्षेत्राकडे वेळोवेळी देणे आवश्यक आहे. शेती क्षेत्रात अतिविद्वान व्यक्तीबरोबरच अतिअज्ञानी व्यक्तीला सामावून घेण्याची क्षमता असल्यामुळे इतर क्षेत्राच्या तुलनेत किंचीत अधिक लक्ष सरकारचे असणे आवश्यक आहे. ''श्रम हे धनापेक्षा श्रेश्ठ आहे'' याची प्रयोगशाळा शेती क्षेत्र आहे. नैतिक मुल्यांची जोपासना सर्वाधिक शेती क्षेत्रात होत असल्यामुळे या क्षेत्राचे महत्व किंवा ओळख वेगळी आहे. ''उत्तम शेती – मध्यम व्यापार –कनिष्ठ नोकरी'' अशी ओळख प्राचीन काळात या क्षेत्राची होती. आज ''उत्तम नौकरी – मध्यम व्यापार – कनिष्ठ शेती'' हे जे समिकरण तयार होत आहे. यावर चिंतन करण्याची गरज आहे व या चिंतनात सर्वाची भूमिका अपेक्षित आहे. ग्राहकांच्या हातात वस्तू पडेपर्यंत मागच्या जेवढ्या अवस्था आहे. त्यात प्रेरणादायी वातावरण शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक असतांना तात्पुरत्या फायद्यासाठी कोणकोण शेतीचे आरोग्य, शेतकऱ्यांचे आरोग्य बिघडवते आहे. यावर तत्काळ आळा घालणे आवश्यक आहे.

प्रदर्शन प्रभावानुसार आपण, आपले शेतकरी, आपले सरकार एकूण सर्वजण आपल्या स्वत:च्या क्षमतेबरोबरच राष्ट्राच्या क्षमतेचा वापर दुसऱ्यांच्या मदतीने करीत आहोत. परंतु यामुळे पाहिजे त्या प्रमाणात फायदा आपणास न मिळता त्याचा फायदा विदेशी लोकांना मिळत जात आहे. मानवाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत, एका पिढीपासून – अनंत पिढ्यांपर्यंत अनेक उपलब्धतता उपलब्ध करून देण्याची क्षमता शेतीमध्ये असल्यामुळे या नैसर्गिक साधनधनाच्या आरोग्याबाबत सकारात्मक दृष्टिकोण बनवून प्रत्येक देशातील शेती, शेतकरी म्हणजेच शेती क्षेत्र व इतरही क्षेत्रांना सारखेच महत्व देऊन मजबूत करणे आवश्यक आहे. आवश्यक त्या उपाययोजना न केल्यास शेती. शेतकरी हाताबाहेर जाणार. पर्यायाने उद्योगक्षेत्र व सेवा क्षेत्र हाताबाहेर जाणार.ज्याप्रमाणे भांडवलशाही भांडवलदाराकडून नष्ट होऊ शकते अगदी तसेच शेती शेतकऱ्यांकडून नष्ट होऊन तो प्रश्न कुणालाही सोडवता न येणारा आहे. यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तात्काळ करणे आवश्यक आहे.

अर्थशास्त्रात ज्याप्रमाणे ''एखाद्या वस्तूला कोणताच पर्याय नाही या गृहीतावर ती संकल्पना किंवा सिध्दांत विकसीत केला जातो. अगदी त्याचप्रमाणे शेती या नैसर्गिक साधनसंपत्तीला कोणतेच पर्यायी साधनधन उपलब्ध नाही. या दृष्टिकोणातून शेतीचा उपजाऊ वापर अर्थव्यवस्थेच्या शाश्वत व सर्वसमावेशक संतुलनासाठी करणे आवश्यक आहे.



Scanned with OKEN Scanner

VOLUME - VIII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

**विषयाची निवड**

शेती व शेतकरी यांचे संबंध पाहिजे त्याप्रमाणात आनंदी नसतांना, शेतकऱ्यांची शेती करण्याची प्रेरणा नष्ट होतांना सरकार, विद्वान मंडळी, शेती संशोधक, इतर संशोधक शेतकऱ्यांशी तात्पूरते संबंध टिकवत आहे, हे समिकरण बदलणे अपेक्षित आहे. या भूमिकेसाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे व शोधनिबंधासाठी दुय्यम सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१. भारतीय शेती व शेतकरी विकासाचा अंतिम स्त्रोत व मर्यादा याचा अभ्यास करणे.

२. भारतीय लोकसंख्या व नैसर्गिक साधनसंपत्तील ''भूमी'' यातील संबंधाचा अभ्यास करणे.

३. ''शेतकऱ्यांवर अन्याय होत असतांना तो नेमका केव्हा पुढे येईल?त्या वर्गाला कोण. पुढे करेल? याचाअभ्यास करणे.

४. शेती क्षेत्राला कोणताच पर्याय नाही या दृष्टिकोणातून शेतीच्या वापराबाबतचा अभ्यास करणे.

५. शेती क्षेत्रातील कायम उपलब्धतेचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीते**

अ) शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असून दुय्यम दर्जाची वागणूक या क्षेत्राला मिळत आहे.

ब) सर्वाच्या खराब मानसिकतेमुळे शेतकरी व शेती क्षेत्र स्वत:च्या आस्तित्वाबरोबरच इतरांना संकटात ओढत आहे.

क) सर्वांची मानसिकता योग्य असल्यास ''शेती'' व शेतकरी देशाच्या विकासाचा अंतिम स्त्रोत आहे.

**१) भारतीय शेती व शेतकरी विकासाचा अंतिम स्त्रोत व मर्यादा**

भारतीय शेती व शेतकरी विकासाचा अंतिम स्त्रोत म्हणजे शेती व माणूस यांचे प्रमाण, शेती वापराबाबत पध्दती यातील संबंध सलोख्याचे असणे होय. तर भारतीय शेती व शेतकरी विकासाची मर्यादा म्हणजे शेती व मानूस यांचे प्रमाण, शेती वापरण्याच्या पध्दती यातील संबंध सलोख्याचे नसणे होय किंवा बिघडणे होय. आज शेती व शेतकऱ्यांना सरकारचा, उद्योजकांचा, संशोधकांचा किंवा जागतिक बाजारपेठेचा पाठींबा नसल्यामुळे शेती व मानूस यांचे प्रमाण बिघडले आहे. शेती वापराबाबत चुकिच्या पध्दती वापरल्या जात आहे. (अन्नधान्याबाबत आपण स्वयंपूर्णता आणली असली तरी जमीनीचे आरोग्य धोक्यात येत आहे.) यात बदल न झाल्यास भारतीय शेती व शेतकरी विकासावरील मर्यादा नक्की ठरतील. याउलट मानसिकता सकारात्मक बनल्यास भारतीय शेती व शेतकऱ्यांमार्फत भारताला विकसीत बनता येईल. थोडा अधिक कालावधी लागेल परंतु त्या विकसीतपणामध्ये शाश्वत व सर्वसमावेशकतेचा भक्कम पाया मजबूत असणारा आहे. नाण्याला दोन बाजू असतात.त्यापैकी पहिली बाजू शेतीक्षेत्र आहे व दुसऱ्या बाजूला उद्योग व सेवा क्षेत्राला समाविष्ट करता येईल.परंतु क्रमामध्ये शेती क्षेत्र प्रथमत: लक्षात घ्यावे लागेल.



Scanned with OKEN Scanner

VOLUME - VIII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

**२) भूमी नैसर्गिक साधनधन व भारताची लोकसंख्या यातील संबंध**

स्वतंत्र भारताच्या सातव्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या (२०११) १२१ कोटी आहे. लोकसंख्येतील मोजक्या चांगल्या वैशिष्ट्यासोबत अधिक वैशिष्ट्ये ही आर्थिक विकासावर मर्यादा घालणारी आहे. उदा. ० ते ०६ वयोगटातील स्त्री – पुरूषाचे प्रमाण खुप – खुप बिघडले आहे, स्त्री – पुरूष प्रमाणामध्येही अजूनही ६० चा फरक पहायला मिळत आहे. कुटुंब नियोजन कार्यक्रमाबाबत अजूनही बऱ्हाचगैरसमजूती दूर झालेल्या नाही. परंतु दुरूस्तीच्या संधी असल्यामुळे दुरूस्तीकरण हळूहळू सुरू आहे. ही जमेची बाजू आहे.

आर्थिक विकासासाठी अनेक घटकांची मदत होते. त्यातील दोन प्रमुख घटक म्हणजे लोकसंख्या व नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. पुन्हा नैसर्गिक साधनसंपत्तीतील ''भूमी'' हा घटक जास्त विचारात घेणे आवश्यक आहे. मानव व भूमी यांचे प्रमाण बिघडत जात आहे. यासाठी भूमीच्या वापराच्या पध्दती व त्याला पर्याप्त लोकसंख्येची जोड मिळणे आवश्यक आहे. इतर देशात क्षेत्रफळाच्या तुलनेत लोकसंख्या कमी आहे व तिथे लोकसंख्येबाबत लोकसंख्या संक्रमणाचा सिध्दांताचा मागच्या बऱ्याच कालावधीपासून वापर होत आहे. लोकसंख्या व भूमी यातील संबंध व भूमिका चांगली बनविण्याकरीता'' लोकसंख्या संक्रमण सिध्दांतातील तीसरी अवस्था प्राप्त करणे आपल्या देशासाठी अतीआवश्यक आहे.

**३) शेती क्षेत्राला कोणताच पर्याय नाही — वापराबाबत दक्षता**

अर्थशास्त्रात डॉ. मार्शल यांनी ''उपभोक्त्याचे संतोशाधिक्य'' व घटत्या सिमांत उपयोगितेचा सिध्दांत मांडतांना फक्त एकाच वस्तूचा विचार उपभोगात केला आहे. डॉ. मार्शल यांच्या या गृहीतावर बऱ्हाच टिका होत असल्या तरी मार्शल चे ते अवास्तविक गृहीत शेती क्षेत्रात अधिक सत्य ठरू शकते. शेतीचा या दृष्टिकोणातून वापर होणे अपेक्षित आहे. असाच वापर झाल्यास उपभोक्त्याला जसे संतोशाधिक्य मिळते तसेच देशाला शेतीपासून सतत संतोषाधिक्य मिळणारे आहे. शेती क्षेत्रात अधिक संतोषाधिक्य मिळवून देण्याची क्षमता आहे. एक बी टाकल्यानंतर हजार बी देण्याची क्षमता शेतीत दिसून येते. सर्वांना सामावून घेण्याची क्षमता शेतीत आहे.

''शेती'' या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर 'शेतीला कोणताच जवळचा पर्याय आज व उद्यालाही उपलब्ध नाही. या दृष्टिकोणातून झाल्यास देशाच्या शाश्वत व सर्वसमावेशक विकासाची गती वाढणारी आहे. परंतु आज एखाद्या वस्तूला अनेक पर्याय आहे तसेच शेतीलाही व शेतकऱ्यालाही पर्याय आहे. या मानसिकतेचे जे आधिक्य वाढलेले आहे. त्यात तात्काळ बदल करणे आवश्यक आहे. यासाठी शेती म्हणजे बुध्दीमान लोकांनी किंवा बुध्दीमान लोकांच्या नियंत्रणात सामान्य मनुष्यांनी करावयाचा व्यवसाय आहे. या समिकरणाला उत्तेजन मिळणे आवश्यक आहे.

**४) शेती क्षेत्रातील कायम उपलब्धता**

भारतीय शेती अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा सुरवातापासूनच असल्यामुळे या क्षेत्रातून बऱ्हाच गोष्टी उपलब्ध होत जात आहे व कायम आहे. एखाद्या वर्षी शेती बुडाल्यास त्याचा परिणाम देशाच्या आर्थिक



Scanned with OKEN Scanner

VOLUME - VIII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

विकासावरही म्हणजे अंदाजपत्रकावर होतो. शेतीमधिल उपलब्धता –(१) अन्नधान्याची उपलब्धता (२) अधिक लोकांना समावून घेण्याची क्षमता—रोजगाराचा प्रमुख स्त्रोत (३) उदरनिर्वाहाचे साधन (४) शासनाच्या उत्पन्नाचा स्त्रोत (५) उद्योगक्षेत्राला कच्चा मालाचा पुरवठा (६) विदेशी रचना व दिशेत वाढीचा स्त्रोत (७) किंमत स्थिरतेला पाठिंबा (८) वन्यजिवांना आधार (९) सेवा क्षेत्राच्या विस्तारणीकरणाला मदत (१०) भारतीय संस्कृतीची ओळख (११) श्रम हे धनापेक्षा श्रेष्ठ – यासाठी मोठी प्रयोगशाळा (१२) निसर्गाशी मैत्रिपूर्ण संबंध/ पर्यावरण संतुलनाला पाठिंबा (१३) कंटाळवाण्या संस्कृतीला आळा/आंनददायी संस्कृतीला प्रोत्साहन (१४) अनुकूलम अनुकुलता— प्रश्न अधिक व युक्त्या अधिक.

भारतीय शेतीतून म्हणजेच शेतकऱ्यांमार्फत बऱ्हाच अनुकूलता मिळत जात असल्या तरी Precaution is better that accident किंवा विकास व आपत्ती किंवा अनुकुलता व आपत्ती किंवा उपलब्धता व आपत्ती यातील संबंध लक्षात घेणे आवश्यक आहे. नाहीतर अनुकुलतेत आपत्ती समाविष्टझाल्यास त्याचा त्रास सर्वांना सहन करावा लागणार व प्रश्न हाताबाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेती क्षेत्रातून कायम उपलब्धता मिळत जात असल्यामुळे या क्षेत्राला प्रत्येक वेळी प्रोत्साहन सर्वांकडून मिळत जाणे अपेक्षित आहे. परंतु आज सर्वात दुर्लक्षित क्षेत्र कोणते बनले असेल तर ते शेती व शेतकरी आहे. याचा फेरविचार करणे व हा विषय अधिक चिंतनशील करणे आवश्यक आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्येसारखी समस्या शेतीच्या उत्पन्न व खर्च यातील बिघाडामुळे निर्माण झाली आहे.

शेतीतील कायम उपलब्ध होणाऱ्या प्रमुख बाबींचा विचार करून शासनाने व बाजारपेठेने मदत करणे आवश्यक झाले आहे. हमीभाव व बाजारभाव यात ताळमेळ जूळणे आवश्यक आहे.

**५) शेतकऱ्यांचे शोषण व शोषण थांबविण्यासाठी प्रयत्न**

एक – दोन वर्षातून एखदातरी उलट्यापट्टीचा अनुभव शेतकऱ्यांना सहन करावा लागतो. उलटीपट्टी म्हणजे "हातातील सर्व शेतमाल विकल्यानंतर जी किंमत मिळते त्या किंमतीतून हमाली, दलाली व इतर खर्च दिल्यानंतर हातात काही न उरता शेतकऱ्यांनाच स्वत: काही रक्कम भरून द्यावी लागते." या उलटीपट्टी मधून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. कृषी विपणण प्रक्रिया यामध्ये प्रमुख आहे. उत्पादकाकडून अंतिम ग्राहकाच्या हातात वस्तु पडेपर्यंत जेवढ्या अवस्था येतात त्या सर्व प्रक्रियांचा समावेश यात होतो.

ई – नाम सारख्या प्रयोगामुळे सुध्दा या प्रक्रियेतील शोषणावर फारसा परिणाम झालेला नाही. शेतकरी कृषी विपणाबरोबर तलाठी, विज मंडळ अधिकारी, कृषी केंद्रातून पुरवठा करणारे प्रमुख (आणि शेतमजूरांचे शोषणाचा अंदाज तर पूर्ण वेगळाच आहे) या मंडळीकडून लुवाडला जात आहे. शेतकऱ्यांच्या शोषणातून स्वत:चा खरा विकास करता येतो असा समज या मंडळींचा झालेला आहे. झटपट श्रीमंत होण्याच्या मार्गात असा प्रकार सुरू झालेला दिसून येते.

शेतकऱ्यांचे शोषण दूर करण्यासाठी प्रथमत: शेतकऱ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे व आपला संघटीतपणा वाढविणे आवश्यक आहे. शेतकरी संघटना ज्या उद्देशाने स्थापण झाल्या आहे. तो उद्देश लक्षात

VOLUME - VIII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

घेऊन संघटनांनी व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे. प्रसंग टळला की बरेचदा संघटना मागे पडतात. ही कृती यात अपेक्षित नाही.

प्रत्येक गैर — सरकारी संघटनेने आपल्या मुख्य कार्याबरोबरच उपकार्यामध्ये शेतीशेतकरी, शेतमजूर व होतकरू विद्यार्थी यांच्या क्षमतांच्याविकासांचा विचार करणे आवश्यक आहे. शोशण शून्य झाल्यास देशाच्या विकासाचा वेग अधिक वेगाने होणार आहे. यात शंका नाही. परंतु या सर्व प्रक्रियेत शासनाची भूमिका प्रत्येक देशातील महत्वपूर्ण आहे.

**समारोप**

भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा शेती व शेतकरी आहे. परंतु सद्यस्थितीत शेतकरी व शेतीशी संबंधित घटकांना शासनाचा तसेच बाजारपेठांचा पाठिंबा मिळत नसल्यामुळे शेती व शेतकरी संकटात आहे. हा मुख्य कणा दुर्बल होत आहे आणि त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था संकटाच्या जवळ जवळ सरकत आहे.

हरितकांतीमार्फत अन्नधान्याबाबत अनुकूलता वाढली असली तरी सीमांत शेतकरी शेतीपासून दूर जात आहे. तसेच मोठ्या शेतकऱ्यांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोण फारसा सकारात्मक नाही. अशा स्थितीत खुप मोठे उपयोगी साधनधन अज्ञानी लोकांकडे सोपवून कृषी संशोधक, शासन त्यांच्याकडून मोठी अपेक्षा करीत आहे. यासाठी सर्वांच्या मानसिकतेत बदल अपेक्षीत आहे.

भारतीय शेतीतून विविध आवश्यक वस्तूंची उपलब्धता होत असल्यामुळे शेतीचे व शेतकऱ्यांचे महत्व कायम आहे. एखादी वर्षी शेती बुडाल्यास त्याचा परिणाम सर्व क्षेत्रावर झालेला पहायला मिळतो.भारतीय शेती व शेतकरी विकासाचा अंतिम स्त्रोत असल्यामुळे वेळोवेळी आलेल्या मर्यादा प्रत्येकाने दूर करणे आवश्यक आहे. मर्यादेकडे दुर्लक्ष झाल्यास अडचणी वाढून हाताबाहेर प्रश्न जाणार, त्यावेळी प्रभावी उपायसुध्दा कुचकामी ठरू शकते. एकूणच शेती, शेतकरी व शेतीशी संबंधित सर्वांनी शासनाच्या मदतीने व जागतिक बाजारपेठेच्या मदतीने हा प्रश्न सोडविल्यास शेती व शेतकरी हा विकासाचा अंतिम स्त्रोत अखंड असणार, यात कोणतीही शंका नाही. जय जवान जय किसान!

**संदर्भ ग्रंथ यादी**

१. भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण व विकास), विनायक देशपांडे व श्रीधर देशपांडे, हिमालया पब्लिशिंग हाऊस, नागपूर
२. कृषी अर्थशास्त्र, विजय कविमंडन, मंगेश प्रकाशन नागपूर
३. मराठी अर्थशास्त्र परिषद, ४३ वे वार्षिक अधिवेशन २०१९, विविध चर्चासत्रे व खुली चर्चा, सोलापूर
४. जागतिकीकरण व ग्रामीण अर्थव्यवस्था, डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांचे व्याख्यान, लोकमान्य महाविद्यालय वरोरा जि.चंद्रपूर १८ डिसेंबर २०१९
५. बाजारभाव व हमीभाव विजय जांवधिया दिवाळी अंक, दै पुण्यनगरी नोव्हेंबर २०१९